# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक:-११ एप्रिल, २०२२

---

जळगाव दि.११ (प्रतिनिधी) आधुनिक भारताचा पाया रचणाऱ्या महात्मा फुले यांच्या विचाराचा प्रभाव शैक्षणिक, सामाजिक, कृषी, तंत्रज्ञान, स्त्रीवाद या क्षेत्रात आजही कायम असून एकमयी समाज हाच फुले यांचा राष्ट्रवाद होता असे प्रतिपादन इतिहासकार डॉ.श्रीमंत कोकाटे यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात ११ एप्रिल ते १४ एप्रिल या कालावधीत महात्मा फुले व डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव साजरा करण्यात येत आहे. या महोत्सवाचे उद्‌घाटन सोमवारी जिल्हाधिकारी डॉ.अभिजीत राऊत यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी होते. यावेळी मंचावर प्रभारी कुलसचिव प्रा.के.एफ.पवार उपस्थित होते. डॉ. कोकाटे यांनी "महात्मा फुले यांच्या विचार कार्याचा विविध समाज समुहावरील प्रभाव " या विषयावर आपले विचार मांडले. ते म्हणाले की, ज्या महाराष्ट्रात छत्रपतींना शिक्षण घेण्यावर बंदी होती त्या ठिकाणी शुद्रातीशुद्र, कष्टकरी वर्गाला शिक्षण मिळावे म्हणून महात्मा फुले यांनी मुलींची आणि त्या नतर मुलांची शाळा सुरु केली. महात्मा फुले यांच्या जाणिवेतच नव्हे तर नेणीवेतही स्त्रियांविषयी आदर होता. महिलांना सार्वजनिक आणि मोफत शिक्षणाचा आरंभ फुलेंनी करुन दिला. फुले यांच्या सत्यशोधकी विचारांचा प्रभाव इतर राज्यातही पडला. सयाजीराव गायकवाड, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, भास्करराव जाधव, जेधे, जवळकर, पंजाबराव देशमुख, कर्मवीर जगदाळे आदींवर महात्मा फुलेंचा प्रभाव होता आणि त्यांनी त्या त्या क्षेत्रात तो विचार पुढे नेला. कष्टकरी आणि श्रमिकांची भाषा महात्मा फुले यांनी साहित्यात आणली. नाभिकांची चळवळ उभी केली. जात, धर्म, पंथ, संप्रदाय या पुरता त्यांचा राष्ट्रवाद सिमित नव्हता. आपण सगळे माणूस म्हणून एक आहोत. अशी त्यांची राष्ट्रवादाची व्याख्या होती. ते बुध्दी प्रामाण्यवादी होते. त्यांचा विचाराचा प्रभाव आजही कायम आहे असे डॉ.कोकाटे म्हणाले.

अध्यक्षीय भाषणात प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांनी सशक्त राष्ट्र निर्मितीच्या योगदानासाठी महापुरुषांच्या विचारांवर चालण्याची गरज आहे. शिक्षण, रोजगार आणि स्वाभिमानाने जगण्याचे अधिकार जो पर्यंत मिळत नाही तोपर्यंत भारत विश्वगुरु होऊ शकणार नाही. त्यामुळे विखुरलेपण विसरुन एकत्र येण्याची गरज आहे. प्रतिक्रिये ऐवजी प्रतिसाद दिला जावा असे आवाहनही त्यांनी केले. उदघाटकीय भाषणात डॉ. अभिजीत राऊत यांनी वैचारिक चळवळीच्या अधिष्ठानाचा उगम विद्यापीठांमधून होत असतो. त्यामुळे अशा कार्यक्रमांची गरज असल्याचे स्पष्ट केले. प्रारंभी प्रा.म.सु.पगारे यांनी महोत्सवाची भूमिका विशद करतांना महापुरुषांच्या विचारांचे अनुयायी निर्माण व्हावेत यासाठी हा महोत्सव असल्याचे सांगितले. या समारंभात प्रा.म.सु.पगारे यांच्या "महात्मा फुले:लिटरेचर ॲण्ड इटस सोशल इम्पॅक्ट " या इंग्रजी ग्रंथाचे प्रकाशन अतिथींच्या हस्ते झाले. भालचंद्र सामुद्रे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. डॉ.अनिल डोंगरे यांनी आभार मानले. विद्यापीठ, फुले-शाहू-आंबेडकर विचारमंच, विचारधारा प्रशाळा, डॉ.आंबेडकर विचारधारा विभाग, बुध्दीस्ट आणि महात्मा फुले अध्ययन व संशोधन केंद्र, डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र, मागासवर्गीय कर्मचारी संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने हा जयंती महोत्सव

घेतला जात आहे.  उद्या दि.१२ एप्रिल रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय स्मारक इंदू मिल आंदोलनाचे प्रणेते आनंदराज आंबेडकर यांचे "आंबेडकरवादी चळवळीचे विविध आयाम आणि आव्हाने" या विषयावर सिनेट सभागृहात सकाळी १०.३० वाजता व्याख्यान होणार आहे.  पोलिस अधिक्षक डॉ. प्रवीण मुंडे प्रमुख अतिथी असून प्रभारी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी. इंगळे अध्यक्षस्थानी असतील.

## बातमी क्र.२

जळगाव दि. ११ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेचे माजी विद्यार्थी व अमेरिकास्थित उद्योजक निलेश पाटील यांच्याकडून १९ विद्यार्थ्यांना राईझ शिष्यवृत्ती  तर २ विद्यार्थ्यांना नोकरी जाहिर केली आहे.

निलेश पाटील हे गेल्या १७ वर्षापासून अमेरिकेत उद्योजक म्हणून कार्यरत असून  विविध कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी समकक्ष पदावर कार्यरत आहेत. संगणकशास्त्र प्रशाळेतील पदव्युत्तर अभ्यासक्रमातील हुशार व गरजू विद्यार्थ्यांना अभ्यासक्रमाचे शिक्षणशुल्क, परीक्षा फी, वसतिगृह व मेसचे शुल्क आणि इतर खर्चासाठी राईझ या शिष्यवृत्ती योजनेंअंतर्गत आर्थिक मदत करीत असतात. नुकतीच त्यांनी प्रशाळेत भेट देऊन विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि १९ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती जाहिर केली आहे. तसेच श्री. पाटील यांनी प्रथम वर्षाच्या दोन विद्यार्थ्यांना नोकरी देण्याचे जाहिर केले आहे. श्री. पाटील यांनी प्रशाळेतील शिक्षकांसमवेत बैठक घेऊन काळाची गरज पाहून आजचे औद्योगिक क्षेत्राातील बदल यावर चर्चा करुन अभ्यासक्रमात काय बदल हवेत आणि थेअरी पेक्षा प्रात्यक्षिकांचा समावेश असलेला अभ्यासक्रम असावा याबाबत चर्चा केली. तसेच विविध प्रकारचे सॉफ्टवेअर विकसित करुन त्याचे पेटंट घ्यायला हवेत अशी अपेक्षा व्यक्त केली.

श्री. निलेश पाटील यांनी कुलगुरु प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांची भेट घेऊन त्यांच्यासमवेतही चर्चा केली. तसेच विद्यापीठाच्या इनक्युबेशन सेंटरला भेट दिली. यावेळी प्रशाळेचे संचालक प्रा.एस.आर.कोल्हे, प्रा.मनीष जोशी, प्रा.भूषण चौधरी, आदी उपस्थित होते.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय देनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी